आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५

ठळक बातम्या

1. देशाला स्वावलंबी बनविण्यासाठी प्रत्येकाने स्वदेशी वस्तू खरेदी कराव्या असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन.

2. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकपूर्तीचा प्रवास प्रेरणादायी असल्याचे पंतप्रधानांचे “मन कि बात” कार्यक्रमात गौरवोद्गार.

3. चंद्रपूर आणि गडचिरोली हा परिसर इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.

4. आशिया क्रिकेट चषक स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणार.

“मन की बात/स्वदेशी

सध्या सण-समारंभाचा काळ आहे. हे सर्व सण फक्त स्वदेशी गोष्टींचा वापर करूनच साजरे करावे असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात कार्यक्रमातून केलं.

*साथियों, एक संकल्प लेकर आप अपने त्योहारों को और खास बना सकते हैं। अगर हम ठान लें कि इस बार त्योहार सिर्फ स्वदेशी चीजों से ही मनाएंगे तो देखिएगा हमारे उत्सव की रौनक कई गुना बढ़ जाएगी। वोकल फॉर लोकल को खरीदारी का मंत्र बना दीजिए ठान लीजिए जो देश में तैयार हुआ है, वही खरीदेंगे।*

देशाला स्वावलंबी बनावयचं असेल तर या ध्येयाचा मार्ग स्वदेशीतूनच जात असल्याचं मोदी यांनी सांगितलं. गेल्या 11 वर्षांमध्ये खादीविषयी देशातील लोकांचं आकर्षण वाढलं असल्याचं सांगत २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंती निमित्त, खादीचं एखादं उत्पादन खरेदी करण्याचा आग्रह त्यांनी जनतेला केला. आकाशवाणीवरील मन कि बात कार्यक्रमातून आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांशी संवाद साधला. मन कि बात कार्यक्रमाचा हा १२६ वा भाग होता. क्रांतिकारी भगतसिंग हे प्रत्येक भारतवासीयासाठी, विशेषतः देशातील तरुणांसाठी एक प्रेरणादायी व्यक्तीमत्त्व आहेत. त्यांच्या स्वभावात निर्भीडता ओतप्रोत भरलेली होती. भगतसिंग लोकांच्या दुःखाबाबत देखील अत्यंत

संवेदनशील होते अशा गौरोद्गारानं मोदी यांनी आज भगत सिंग यांच्या जयंती दिनी त्यांना आदरांजली वाहिली. त्याचप्रमाणे आज गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी त्यांच्यासोबतच्या आपल्या आठवणींना मोदींनी उजाळा दिला आणि लता दीदींनी गायलेलं आणि सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेलं 'ज्योति कलश छलके' हे गाणं श्रोत्यांना ऐकवलं. नवरात्रीच्या काळात आपण शक्तीची उपासना करतो. व्यवसायापासून क्रीडा क्षेत्रापर्यंत आणि शिक्षण क्षेत्रापासून विज्ञानापर्यंत सर्व क्षेत्रात देशाच्या सुकन्या स्वतःची पताका फडकावत आहेत, असं पंतप्रधान म्हणाले. कोलकात्याचा दुर्गा पूजा महोत्सव युनेस्कोच्या सांस्कृतिक सूचीमध्ये समाविष्ट झाला आहे त्याचप्रमाणे युनेस्कोच्या सांस्कृतिक वारशाच्या सूचीमध्ये छट पूजेला स्थान मिळावं यासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचं मोदींनी सांगितलं. यासोबतच लोकप्रिय असामी गायक झुबीन गर्ग आणि ज्येष्ठ कानडी साहित्यिक एस.एल.भैरप्पा यांना पंतप्रधानांनी आजच्या कार्यक्रमातून श्रध्दांजली वाहिली.

<u>'मन की बात/आरएसएस</u>

यावर्षी विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला 100 वर्ष होत आहेत. एका शताब्दीचा हा प्रवास जितका अद्भूत आहे, तितकाच तो प्रेरक असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी काढले. आज आरएसएस 100 वर्षे न थकता, न थांबता, अखंड राष्ट्रसेवेच्या कार्यामध्ये गुंतलेला आहे. देशामध्ये कुठेही नैसर्गिक आपत्ती आली तर आर.एस.एसचे स्वयंसेवक सर्वात प्रथम तिथे पोहोचतात. लक्षावधी स्वयंसेवक 'राष्ट्र प्रथम' या भावनेने देशहितासाठी कार्य करतात, असं मोदी आजच्या मन की बात कार्यक्रमात म्हणाले.

*जब राष्ट्रीय स्वयंसेवक संघ की स्थापना हुई थी तब देश गुलामी की जंजीरों में बंधा था। देश की आज़ादी के साथ साथ ये भी महत्वपूर्ण था कि देश वैचारिक गुलामी से भी आज़ाद हो।ऐसे में परम पूज्य डॉ.हेडगेवारजी ने इस विषय में मंथन करना शुरू किया और फिर 1925 में विजयादशमी के पावन अवसर पर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ की स्थापना की। त्याग और सेवा की भावना और अनुशासन की सीख यही संघ की सच्ची ताकत है।*

संघगीत

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही निवडक संघगीतांना गायक-संगीतकार शंकर महादेवन यांनी नव्याने संगीतबद्ध केलं आहे. नव्या संगीताचा साज चढलेल्या या संघगीत संग्रहाचं लोकार्पण आज सायंकाळी 6 वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात होणार आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते या संघगीत संग्रहाचं लोकार्पण होणार असून, या सोहळयास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षल मुक्त होणार असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. श्यामा प्रसाद मुखर्जी फाउंडेशन तर्फे आयोजित भारत मंथन २०२५ या राष्ट्रीय संमेलनाच्या समारोपीय सत्राला शाह संबोधित करत होते. अकरा वर्षा आधी जम्मू काश्मीर, नक्षलवादी चळवळ आणि ईशान्य भारतातील फुटीरतावादी चळवळ हे तीन अंतर्गत सुरक्षेसाठी सर्वात मोठे धोके होते. मात्र रालोआ सरकार स्थापन झाल्यानंतर तिन्ही ठिकाणच्या फुटीरतावादी चळवळी मोडून पडल्याचं शाह यावेळी म्हणाले.

सेवा पर्व

सेवा आणि सुशासन या सूत्राच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी निरंतर प्रयत्नरत आहे. सेवापर्व निमित्त विशेष मालिकेच्या आजच्या भागात, सरकारने वित्तीय समावेशन क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा जाणून घेऊया-

*गेल्या दशकात वित्तीय समावेशकता हे भारताच्या विकासगाथेचे आधारस्तंभ राहिले असून, नरेंद्र मोदी सरकारच्या मुख्य प्राधान्यांपैकी एक आहे. २०१४ मध्ये पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यानंतर सुरू केलेल्या पहिल्या प्रमुख योजनांपैकी प्रधानमंत्री जन धन योजना एक होती. ही योजना केवळ बँक खाते उघडण्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सर्वसामान्य नागरिकांच्या सशक्तीकरणाचे एक महत्त्वाचे साधन ठरली.*

*जनधन अकाउन्ट जब खोले गए ना, उधर बैंक का अकाउन्ट था ऐसा नहीं है उसे एक स्वाभिमान मिला था ये बैंक के दरवाजे मेरे लिए भी खुलते हैं। मैं भी बैंक के दरवाजे में जा करके टेबल पर हाथ रख करके बात कर सकता हूँ। ये विश्वास हमने जगाया है।*

*(आज ५६ कोटींहून अधिक जन धन खात्यांसह, ही योजना जगातील सर्वात मोठा वित्तीय समावेशन उपक्रम बनली आहे. यातील ६७ टक्के खाती ग्रामीण आणि निमशहरी भागांमध्ये आहेत, तर ५६ टक्के खाती महिलांच्या नावावर आहेत. हे आकडे या योजनेच्या व्यापक यशाची आणि तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचल्याची साक्ष देतात.)*

<u>इंडस्ट्रियल मॅग्नेट</u>

चंद्रपूर आणि गडचिरोली हा परिसर इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होत आहे. त्यामुळे दीड लक्ष लोकांना रोजगार मिळणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखून हा विकास आपल्याला करायचा आहे. कौशल्य विकास आणि रोजगारावर भर देऊन 100 टक्के स्थानिकांना रोजगार मिळेल, अशी व्यवस्था आपण उभी करणार आहोत असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. मुल येथील विश्रामगृहात, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचं अनावरण करताना मुख्यमंत्री बोलत होते.

*चंद्रपूर जिल्हा आणि गडचिरोली जिल्हा हा एक प्रकारचा इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होणार आहे. मला स्वतःचा अंदाज आहे की या दोन जिल्ह्यातूनच आपण जवळपास दीड लाख लोकांना रोजगार देऊ शकतो. ही व्यवस्था उपयोगी असताना आपला प्रयत्न आहे की पर्यावरणाच संतुलन देखील राहिलं पाहिजे.*

खनिज उत्खनन आणि वाहतुकीमुळे स्थानिकांना त्रास होतो. त्यामुळे सर्वात जास्त वाटा स्थानिक लोकांनाच मिळाला पाहिजे असं फडणवीस म्हणाले.

<u>तामिळनाडू चेंगराचेंगरी</u>

तमिळनाडूतील करूर इथं काल अभिनेता आणि तमिळगा वेत्री कळगम पक्षाचे अध्यक्ष जोसेफ विजय यांच्या राजकीय सभेत झालेल्या चेंगराचेंगरीतील मृतांचा आकडा वाढून ३९ वर पोहोचला आहे. या घटनेत जखमी झालेल्या ५० हून अधिक लोकांना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं असून, त्यापैकी २३ हून अधिक लोकांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टालिन यांनी या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे या घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय चौकशी आयोगाची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान या दुर्घटनेनंतर केंद्र सरकारने तातडीने तमिळनाडू सरकारकडून याबाबत अहवाल मागवला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करूर इथं झालेल्या दुःखद घटनेतील मृतांच्या कुटुंबियांसाठी आणि जखमींसाठी मदत

जाहीर केली आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या प्रत्येक कुटुंबियांना २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

<u>मुख्यमंत्री आढावा</u>

राज्यात अनेक ठिकाणी आजही मुसळधार पाऊस होत असून अनेक ठिकाणी पूरस्थिती कायम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करुन पावसाच्या, मदतकार्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. पावसामुळं धरणांचे विसर्ग वाढविले जात असताना नागरिकांना आधीच सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यावर लक्ष केंद्रीत करावं आणि सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर राहून काम करावं, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

<u>क्रिकेट</u>

आशिया क्रिकेट चषक स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरू होईल. या स्पर्धेच्या ४१ वर्षांच्या इतिहासात प्रथमच भारत - पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होत आहे. आतापर्यंत या दोन संघांमधे टी-ट्वेंटी चे १५ सामने झाले असून त्यात १२ वेळा भारतीय संघ विजयी ठरला आहे.

<u>हवामान</u>

अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचलं आहे. परिणामी वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागत आहे. दरम्यान काल सकाळी साडे आठ ते रात्री साडे आठ वाजेपर्यंत अकोला शहरात ६२ पूर्णांक ४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून शहरात एक व्यक्ती नाल्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना घडली आहे. मागील 24 तासांत विदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील लोणार इथं ८६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्या खालोखाल यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड इथे 88.3 मिलिमीटर आणि चंद्रपूर इथं 81 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान पुढील दोन दिवस विदर्भातील सर्व जिल्ह्यात हवामान सामान्य राहणार असल्याचं प्रादेशिक हवामान खात्यानं सांगितलं आहे.

*****